# प्रकरण ५

# भारतीय राज्यघटना निर्मितीची प्रक्रिया

# भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर



https://www.google.co.in/search?q=बाबासाहेब+आंबेडकर&tbm=isch&tbo=u&source=univ&sa=X&ei=SbYyU5DIGc_OrQfX7YH4Dg&ved=0CD
YQsAQ&biw=1008&bih=582#facrc=_&imgdii=_&imgrc=2TGHjfa2HUa0TM%253A%3B_KHpVcXvgJ5RhM%3Bhttp%253A%252F%252F
3.bp.blogspot.com%252F_Rafq9GKBK1s%252FS8IWf9gnfRI%252FAAAAAAAAAGM%252FL8uP9_-
URCs%252Fs320%252FDr%2520Ambedkar%3Bhttp%253A%25

संविधान या शब्दाचा अर्थ समजण्यासाठी आपण खो-खो या खेळाचे उदाहरण घेऊ. खो-खोच्या स्पर्धेत दोन संघ सहभागी होतात. या दोन संघाच्या खेळाडूंमध्ये स्पर्धा असते. मैदानातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी समर्थक आणि प्रेक्षक असतात. तसेच पंच (अम्पायर) हे देखील खेळाचा भाग असतात. या सर्व घटकांमध्ये सर्वात महत्त्वाचा घटक कोणता असतो?

खेळाडू, पंच कि प्रेक्षक?

अंतिम निर्णय कोणाच्या हातात असतो?

कदाचित याचे उत्तर तुम्ही पंच असे देऊ शकता. पण पंच स्वत:च्या मनाने निर्णय देऊ शकत नाही. त्यासाठी पंचाला नियमांचा आधार घ्यावा लागतो.

त्यामुळे खेळात नियम किंवा अटी या सर्वांत महत्त्वाचा घटक ठरतात. नियमांशिवाय आपण खेळाच्या स्पर्धेची कल्पनाही करु शकत नाही. नियमांशिवाय आपण कोणताही खेळ खेळू शकणार नाही.


याच पध्दतीने कोणताही देश हा नियमांच्या आधाराशिवाय चालू शकत नाही. प्रत्येक देशाच्या कामकाजासाठी नियमांची गरज असते. ते नियम एका पुस्तकात लिहून ठेवलेले असतात, त्या नियमांच्या संचाला राज्यघटना किंवा संविधान असे म्हणतात.

❖ संविधान म्हणजे काय?

- संविधानानुसार राज्यकारभार करण्याचे तत्त्व बहुतेक सर्वच देशांनी स्वीकारले आहे.
- प्रत्येक देशाच्या संविधानाचे स्वरुप वेगळे असते, कारण प्रत्येक देशाची समाज रचना, परंपरा, इतिहास आणि भौगोलिक रचना भिन्न असते.
- प्रत्येक देशाच्या गरजा आणि उद्दिष्टे ही वेगवेगळी असतात.
- त्यानुसार प्रत्येक देश आपापले संविधान निर्माण करण्याचा प्रयत्न करतो.

- देशाच्या राज्यकारभारासाठी तयार करण्यात आलेले मूलभूत कायदे ज्या ग्रंथात एकत्रित आहेत, त्यास संविधान असे म्हणतात.
- संविधानालाच राज्यघटना असे ही म्हणतात.
- यात नागरिकांचे हक्क, शासनसंस्थेची रचना व अधिकार नमूद केलेले असतात.
- संविधान हा शब्द देशाचा मूळ कायदा असतो.
- इतर सर्व कायदे संविधानापेक्षा दुय्यम असतात.
- संविधान हे शासन चालवण्याचे साधन आहे.
- संविधानाच्या चौकटीत शासनाचे सर्व घटक कार्य करतात.
- देशातील संविधानात शासन आणि नागरिक यातील संबंधांचे स्वरुपही संविधानात स्पष्ट असते.

# भारतीय संविधान


भारत का संविधान
THE CONSTITUTION OF INDIA
WE, THE PEOPLE OF INDIA
SOVEREIGN DEMOCRATIC REPUBLIC
JUSTICE, social, economic and political:
LIBERTY
EQUALITY
FRATERNITY
IN OUR CONSTITUENT ASSEMBLY
HEREBY ADOPT, ENACT AND GIVE TO OURSELVES THIS CONSTITUTION.

❖ **आपल्याला राज्यघटनेची गरज का असते?**

१. राज्यघटनेत नागरिकांचे मूलभूत हक्क दिलेले असतात. त्यामुळे व्यक्तीला आपल्या अधिकारांबद्दल कल्पना येते.

२. राज्यघटना सरकारच्या यंत्रणा स्पष्ट करते.

**उदा –**

कायदेमंडळाचे स्वरुप, कार्यकारी मंडळाचे स्वरुप, न्यायमंडळाचे स्वरुप याचबरोबर स्थानिक शासन यंत्रणा इ.

३. निर्णय प्रक्रिया व धोरणे ठरवण्याची प्रक्रिया यासंबंधी असणाऱ्या यंत्रणेचे स्पष्टीकरण राज्यघटनेत दिलेले असते.

४. सरकारवर नियंत्रण ठेवणाऱ्या साधनांचे राज्यघटनेत स्पष्टीकरण केलेले असते.

त्यामुळे शासनाच्या कामकाजामध्ये संविधान हे महत्त्वाचे घटक आहे.

**❖ कोणत्या परिस्थितीत घटनेची गरज निर्माण होते?**

१. सामाजिक, राजकीय क्रांतीनंतर

उदा :–

रशिया, चीन

२. लोक परकीय सत्ता स्वीकारण्यास नकार देतात तेव्हा.

उदा :–

आफ्रिका, आशिया खंडातील देश

३. छोटी राज्ये एकत्र येऊन नवीन देश तयार होतो.

उदा: –

अमेरिका

४. राज्याचे विभाजन होऊन दोन किंवा अधिक राज्ये तयार होतात.

उदा :–

बांग्लादेश, सोव्हियत रशिया, युक्रेन

## ❖ भारताची संविधान सभा (घटना समिती) –

- १९४५ मध्ये दुसरे महायुध्द संपल्यानंतर ब्रिटिश सरकारने सत्तेचे हस्तांतरण करण्याच्या दृष्टीने करावयाच्या उपाय योजनांच्या संदर्भात एक ३ सदस्यांचे शिष्टमंडळ भारतात पाठविले.
- कॅबिनेट मिशन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या शिष्टमंडळाने १६ मार्च १९४६ या दिवशी घोषित केलेल्या प्रस्तावांमध्ये भारताच्या भविष्यातील प्रशासनासाठी राज्यघटना समिती निर्माण करण्याचा प्रस्ताव केला होता.

- भारताचे संविधान तयार करण्याचे काम संविधान सभेने केले.
- १९४६ च्या कॅबिनेट मिशन प्लान नुसार ही सभा स्थापन करण्यात आली.
- ब्रिटिश सरकारने प्रशासकीय (राज्यकारभाराच्या) सोईसाठी मुंबई प्रांत, बंगाल प्रांत व मद्रास प्रांत अशा विविध प्रांतात भारताची विभागणी केली.
- या प्रांतातील राज्यकारभार तेथील लोकप्रतिनिधींमार्फत चालवला जात होता.
- या लोक प्रतिनिधींनी संविधान सभेतील काही सदस्यांची निवड केली.

- त्या काळात देशातील काही भागांचा कारभार संस्थानिकच पाहत होते. अशा भागांना संस्थाने म्हणत.
- या संस्थानांचे ही काही प्रतिनिधी संविधान सभेत होते.
- अशाप्रकारे प्रांत व संस्थानांच्या प्रतिनिधींची मिळून संविधान सभा तयार झाली.
- सुरुवातीला संविधान सभेमध्ये ३८९ सदस्य होते.
- डॉ. राजेंद्रप्रसाद घटना समितीचे अध्यक्ष होत.
- त्यांच्या अध्यक्षतेखाली या समितीची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी घेण्यात आली.
- फाळणी नंतर या सभेची सदस्य संख्या २९९ इतकी झाली. (२२९ प्रांताचे आणि ७० संस्थानांचे प्रतिनिधी)

- या सभासदांमध्ये सर्व जातिधर्मांचे, विविध भाषा बोलणारे व विविध व्यवसाय करणारे लोक होते.
- संविधान सभेच्या कामात सुसूत्रता यावी.
- यासाठी संविधान सभेने संविधान तयार करताना २२ समित्या तयार केल्या.

उदा-

१. राष्ट्रध्वजाविषयीची समिती

२. मूलभूत हक्कविषयक समिती इत्यादी.

- संविधान सभेत डॉ. राजेंद्रप्रसाद, पं. जवाहरलाल नेहरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अबुल कलाम आझाद, सरोजिनी नायडू, जे. बी. कृपलानी, राजकुमारी अमृत कौर, हंसाबेन मेहता, दुर्गाबाई असे अनेक मान्यवर सदस्य होते.
- बी. एन. राव या कायदेतज्ज्ञांची संविधान सभेचे कायदेविषयक सल्लागार म्हणून नेमणूक झाली होती.

- या समित्यांनी त्यांच्याकडे सोपवण्यात आलेल्या विषयांचा सखोल अभ्यास करुन अहवाल तयार केले.
- या अहवालातील शिफारशी विचारात घेऊन संविधानाचा मसुदा तयार करण्यात आला.
- संविधानाचा मसुदा तयार करण्याचे काम मसुदा समितीकडे सोपवण्यात आले.
- मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते.
- डॉ. आंबेकरांचा विविध देशांच्या संविधानांचा सखोल अभ्यास होता.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेला संविधानाचा मसुदा फेब्रुवारी १९४८ मध्ये प्रसिध्द करण्यात आला.
- त्यावर कलमवार चर्चा करण्यात आली, त्यात दुरुस्त्या सुचवण्यात आल्या.
- त्या नंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे संविधान स्वीकृत करण्यात आले.

- संविधान लिहून पूर्ण करण्यासाठी २ वर्षे , ११ महिने आणि १८ दिवस इतका कालावधी लागला.
- यात ३९५ अनुच्छेद आणि ८ अनुसुच्या असलेल्या घटनेला घटना समितीने २६ नोव्हेंबर १९४९ ला मान्यता दिली.
- २६ जानेवारी १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## ❖ संविधान सभेच्या महत्त्वाच्या समित्या –

| समिती | अध्यक्ष |
| --- | --- |
| मसुदा समिती | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |
| मूलभूत हक्क सल्लागार समिती | वल्लभभाई पटेल |
| केंद्र अधिकार समिती | पंडित जवाहरलाल नेहरु |

## ❖ सरनामा / प्रास्ताविका / उद्देश्यपत्रिका –

- भारतीय संविधनाचा सरनामा म्हणजे संविधानाची प्रस्तावना किंवा उद्देश्यपत्रिका होय.
- संविधानाच्या प्रास्ताविकेतून संविधानाचे तत्त्वज्ञान व मूल्ये स्पष्ट होतात.
- भारताच्या सर्वांगीण विकासाठी आवश्यक असणारी उद्दिष्टे यामध्ये सांगितली आहेत.
- म्हणून प्रास्ताविका ही संविधानाचा अर्थ समजण्याची गुरुकिल्ली आहे.

- संविधानाची प्रास्ताविका हा संपूर्ण घटनेचा सारांश आहे.
- घटनादुरुस्ती करताना किंवा कोणताही कायदा करताना घटनेच्या मूलभूत स्वरुपाला धक्का लागणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.
- १९७६ च्या ४२ व्या घटनादुरुस्तीने प्रस्ताविकेत समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष या शब्दांबरोबर एकता व एकात्मता हे शब्द समाविष्ट केले आहे.

# सरनामा

## भारताचे संविधान

प्रास्ताविका

**आम्ही, भारताचे लोक,** भारताचे एक **सार्वभौम**
**समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा

व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत.



संविधानाची उद्दिष्टे
स्वातंत्र्य
समाजवाद
लोकशाही
धर्मनिरपेक्षता
बंधुता
समता
न्याय

## ❖ संविधानाची उद्दिष्टे –

१. लोकशाही –

लोकांनी लोकांसाठी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही होय.

- लोकशाहीचा स्वीकार करुन प्रत्येक भारतीय नागरिकाला राज्यकारभारात सहभागी होण्याचा अधिकार संविधानाने दिला आहे.
- १८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार आहे.
- सर्व भारतीयांना निवडणूक लढवण्याचा अधिकार आहे.

## २. समाजवाद –

- समाजवादाचा स्वीकार करुन आर्थिक विषमता व शोषण नष्ट करण्याचे तत्त्व मान्य केले आहे.
- गरीब व श्रीमंत हा भेदभाव नष्ट करणे.
- दुर्बल घटकांना संरक्षण देणे.

## ३. धर्मनिरपेक्षता –

- कोणत्याही विशिष्ट धर्माला मान्यता दिलेली नाही.
- देशाच्या कारभारात कोणताही धर्म, संप्रदाय यांचा हस्तक्षेप नसावा.

४. न्याय –

- विषमता दूर करुन प्रत्येक व्यक्तीला विकासाची समान संधी देणे.
- सामाजिक न्याय म्हणजे धर्म, जात, वंश, लिंग, संपत्ती व सामाजिक स्थान यांवर आधारित भेद करु नये आणि प्रत्येक व्यक्तीला समान दर्जा देणे.

५. स्वातंत्र्य –

- संविधानाने नागरिकांना विविध प्रकारची स्वातंत्र्ये दिली आहेत.
- धार्मिक स्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य इ.
- स्वत:चा आणि समाजाचा विकास करण्याची संधी स्वातंत्र्यामुळे नागरिकांना मिळाली.


## ६. समानता –

- संविधानाने समानतेचे मूल्य स्वीकारले आहे.
- धर्म, जात, वंश, लिंग यांच्या आधारे राज्याला व्यक्तींमध्ये भेद करता येत नाही.
- सामाजिक व आर्थिकदृष्टया मागासलेल्या समाज घटकांसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार संविधानाने शासनाला दिला आहे.

७. बंधुता –

- बंधुता म्हणजे कोणताही भेद न करता सर्व लोकांविषयी आदर व प्रेमाची भावना असणे.
- भारतीय नागरिकांनी परस्परांवर विश्वास ठेवावा व देशाचा विकास साधावा. हे यात अपेक्षित आहे.

ही उद्दिष्टे सहज साध्य करता यावीत, म्हणून आवश्यक त्या तरतुदी संविधानात केल्या आहेत.


संविधानाची प्रस्तावना
आम्ही भारताचे लोक
सार्वभौम
समाजवादी
धर्मनिरपेक्ष
लोकशाही
गणराज्य
न्याय
स्वातंत्र्य
समता
बंधुता

❖ संविधानाची प्रस्तावना –

➢ आम्ही भारताचे लोक –

हे संविधान भारतीयांनी त्यांच्या प्रतिनिधींच्याद्वारे तयार केले आहे. ते कोणी परकीय व्यक्तीने किंवा राजाने तयार करुन दिले नाही.

➢ सार्वभौमत्व –

लोकांकडे अंतर्गत किंवा बाहय स्वरुपाचे निर्णय घेण्याचा सर्वोच्च अधिकार आहे. कोणतीही बाहय सत्ता भारताच्या शासनावर नियंत्रण ठेवू शकत नाही.

- **समाजवादी** –

संपत्ती ही समाजात तयार केली जाते आणि ती समाजाने समान पध्दतीने वापरली पाहिजे. शासनाने जमीन व कारखान्यांच्या मालकीवर नियंत्रण ठेवले पाहिजे त्यामुळे सामाजिक व आर्थिक विषमता दूर केली जाईल.

- **धर्मनिरपेक्ष** –

या तत्त्वानुसार नागरिकांना कोणत्याही धर्माचे पालन करण्याचा अधिकार आहे; परंतु कोणत्याही विशिष्ट धर्माला भारताचा धर्म म्हणून मान्यता दिलेली नाही. तसेच सर्व धर्माच्या चालीरीती, विश्वास यांना सरकार समान मान देते.

- **लोकशाही** –

  लोकशाही हा एक शासन प्रकार की जेथे लोकांना समान राजकीय हक्क असतात, ते राज्यकर्त्यांना निवडून देतात आणि त्यांच्यावर विश्वास ठेवतात. काही मूलभूत नियमांच्या आधारे शासन व्यवहार केले जातात.

- **गणराज्य** –

  राज्यप्रमुख हा निवडून आलेला असतो. त्याला ते पद वंश-परंपरेने मिळत नाही.

- **न्याय** –

नागरिकांमध्ये जात, धर्म आणि लिंग अशा प्रकारे भेदभाव केला जात नाही, सामाजिक विषमता कमी केली जाते. शासनाने सर्वांच्या कल्याणासाठी विशेषत: दुर्बल लोकांसाठी काम केले पाहिजे.

- **स्वातंत्र्य** –

नागरिकांवर निष्कारण बंधने घातली जाऊ नयेत, विशेषत: ते काय विचार करतात, ते आपले विचार कसे मांडतात आणि त्यांच्या विचारांनुसार कशी कृती करतात यावर बंधने असू नयेत.

- **समता** –

कायदयासमोर सर्व समान असतात. पारंपरिक पध्दतीने चालत आलेली सामाजिक विषमता नष्ट केली पाहिजे. शासनाने सर्वांना समान संधी दिली पाहिजे.

- **बंधुता** –

आपण सर्वांनी जणू काही आपण एका कुटूंबाचे घटक आहोत अशा पध्दतीने वर्तन केले पाहिजे. कोणत्याही नागरिकाला इतरांनी कनिष्ठतेची वागणूक देऊ नये.

सरकारच्या कोणत्याही कायद्याचे किंवा कृतीचे परीक्षण आणि मूल्यमापन करण्यासाठी तसेच त्या योग्य की अयोग्य ठरविण्यासाठी सरनामा ही एक मोजपट्टी आहे. तो भारताच्या संविधानाचा आत्मा आहे.

## ❖ सरनाम्याचे विभाग –

१. सत्तेचे उगमस्थान : आम्ही भारतीय लोक

२. मूलभूत उद्दिष्टे :
   (अ) न्याय
   (ब) स्वातंत्र्य
   (क) समता
   (ड) बंधुता
   (इ) राष्ट्राची एकता व एकात्मता

३. राजकीय व्यवस्था स्वरुप :

(अ) सार्वभौम
(ब) समाजवादी
(क) धर्मनिरपेक्ष
(ड) लोकशाही
(इ) गणराज्य

४. घटना स्वीकारली :

२६ नोव्हेंबर १९४९

५. घटना अमलात आली :

२६ जानेवारी १९५०

# Assessment

- योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१. संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष ....... हे होते.
(डॉ. बाबासाहेब आंबेडकर,पं. जवाहरलाल नेहरु,डॉ.राजेंद्रप्रसाद)
२. ..... संविधानाची अंमलबजावणी करण्यात आली.
(२३जानेवारी १९५०,२६जानेवारी१९५०, २५जानेवारी१९५०
३. संविधान सभेचे कायदेविषयक सल्लागार म्हणून ..... यांची नेमणूक झाली होती.
(सरदार वल्लभभाई पटेल, दुर्गाबाई, बी. एन. राव)

# Exercises

- आपल्या परिसरातील सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभेला पालकांसमवेत उपस्थित राहून सभेचे कामकाज कसे चालते ते पहा.
- आपल्या परिसरातील पतपेढीच्या वार्षिक सभेस उपस्थित राहून कामकाजाचे निरीक्षण करा.